दैनिक देशदूत- 14 ऑक्टोबर,2023

# सायबर सुरक्षा जनजागृती

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत आहेत. या सगळ्याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून कोणती खबरदारी घेतली पाहिजे. याबाबत माहिती देण्यात आली.